रयत शिक्षण संस्थेचे,

# आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)

ता. पलूस, जि. सांगली

दिनांक : 5 डिसेंबर 2019

## राष्ट्रीय सेवा योजना

## जागतिक एड्स निर्मूलन दिन

आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने '**दि. १ डिसेंबर जागतिक एड्स निर्मूलन दिना**'निमित्त दि. ०५ डिसेंबर २०१९ रोजी जागतिक एड्स निर्मूलन दिन साजरा करण्यात आला. यावेळी ग्रामीण रुग्णालय पलूस येथील समुपदेशक डॉ. अनिता जाधव यांचे प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात त्यांनी उपस्थितांना एड्स रोग होण्याची कारणे, त्याचे दुष्परिणाम आणि त्यावरील उपाययोजनाविषयक प्रबोधन केले. आपले नैतिक आचरणच आपणास एड्ससारख्या जीवघेण्या रोगापासून दूर ठेऊ शकते. असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम लाभले होते. त्यांनी एड्स रोगापासून बचाव करण्यासाठी कशाप्रकारे काळजी घ्यायला हवी, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. खाडे ए. एस. यांनी केले. आभार प्रा. सतीश मस्के यांनी मानले. तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. बी.ए. सोनार यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन कार्यक्रम अधिकारी डॉ. के. बी. भोसले यांनी केले.

**निष्पत्ती (Outcome)**

- विद्यार्थ्यांना एड्स रोगाबद्दल माहिती मिळाली.

लाभार्थी संख्या : 63







कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

प्राचार्य,
आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)